


## परिचित अभंगांची पुस्तिका

(२६ संतांचे १३५ अभंग, १८ धुनी, पंचपदी व आरतीसह)

संकलन

ज्ञान प्रबोधिनी, पुणे



# रंगू अभंगांचे ठायी

## परिचित अभंगांची पुस्तिका

### २६ संतांचे १३५ अभंग, १८ धुनी पंचपदी व आरतीसह

संकलन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

---

**प्रकाशक – कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३०.**

**अक्षर जुळणी व मुद्रक – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे**

© सर्व अधिकार प्रकाशकांच्या स्वाधीन

**प्रथम आवृत्ती : सौर आषाढ शके १९३०/ जून २००८**
**(आषाढी एकादशी)**

**द्वितीय आवृत्ती : सौर आषाढ शके १९४५/ जून २०२३**
**(आषाढी एकादशी)**

**मूल्य : ₹ ४०/–**

**वितरण :** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३०
☎ ०२०–२४२०७१७४
**ऑनलाइन खरेदीसाठी –** jpprakashane.org

# प्रस्तावना

ज्ञान प्रबोधिनीच्या सर्व केंद्रांवर उपासना मंदिरांत अखंड हिंदुस्थानाचा प्राकृतिक नकाशा चित्रमूर्ती म्हणून लावलेला असावा, तिथे रोज उपासना व्हावी, स्वातंत्र्यदिनी आणि प्रजासत्ताक दिनी प्रबोधिनीच्या केंद्रांच्या कार्यालयांवर तिरंगा राष्ट्रध्वज फडकवावा, गुढीपाडवा आणि दसऱ्याला भगवा ध्वज फडकवावा, वर्षारंभ आणि वर्षान्ताला विशेष उपासना व्हावी, असे संकेत रूढ होत गेले आहेत. यामागे आपल्या राष्ट्रीय व सांस्कृतिक वारशाची आठवण सर्व सदस्यांना होत राहावी हा हेतू आहे. तिरंगा ध्वज फडकवताना देशाच्या प्राचीन व समकालीन इतिहासाचे, राष्ट्ररचनेसाठी चाललेल्या प्रयत्नांचे, राष्ट्रापुढील आह्वानांचेही स्मरण केले जाते. वर्षारंभ व वर्षान्त उपासनेच्या वेळी वेद, उपनिषदे, गीता यांतील मंत्रांचे व श्लोकांचे गायन होते, त्यांच्या अर्थाचे वाचन होते आणि आपल्या सांस्कृतिक परंपरेच्या अखंडत्वाचे दर्शन होते.

वेद, उपनिषदे, गीता आणि भागवतामधील संस्कृत भाषेतला अध्यात्मज्ञानाचा ठेवा स्थानिक भाषांमध्ये अभंग, दोहे, पदे यांच्या रूपात प्रान्तोप्रान्तीच्या संतांनी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवला. महाराष्ट्रामध्ये यात वारकरी संप्रदायाचा मोठा वाटा आहे. निवृत्तीनाथ ते निळोबा अशा संत-परंपरेने सुमारे सव्वाचारशे वर्षे महाराष्ट्रात अध्यात्मविचारांचे सिंचन केले. ती परंपरा आजही भजन-कीर्तन-प्रवचन-पारायण सप्ताह-वारी या कृतिरूप मार्गाने जिवंत आहे. राष्ट्रीय-सांस्कृतिक-आध्यात्मिक वारसा समाजाने कसा जतन करून ठेवला आहे हे कळण्यासाठी समाजात प्रचलित प्रथांचा अनुभव घ्यावा लागतो. त्यासाठीचा एक प्रयत्न म्हणून प्रबोधिनीच्या केंद्रांवर वर्षातून निदान एकदा भजन करण्याचा पायंडा पडला.

भजनात दोन प्रकार असतात. भक्तिरसात धुंद होऊन विविध धुनी आळवणे, नामाचा गजर करणे, भक्तिपूर्ण पदे गाणे हा एक

प्रकार. संतांच्या रचनांचा अर्थ समजावून सांगणारे निरूपण सांगणे, ऐकणे व अर्थ समजून घेतल्यानंतर त्या रचनांचे गायन करणे हा दुसरा प्रकार. प्रबोधिनीमध्ये अर्थाच्या निरूपणासह गायन करण्याला प्राधान्य असते. प्रबोधिनीच्या पुणे केंद्रामध्ये वारंवार जे अभंग निरूपणासह गायले गेले अशा सुमारे ५० अभंगांचे व काही धुनींचे संकलन एका छोट्या पुस्तिकेच्या आकारात सुमारे पंधरा वर्षांपूर्वी मुद्रित केले गेले. 'रंगू अभंगांचे ठायी' असे त्या पुस्तिकेचे शीर्षक होते. प्रबोधिनीच्या अन्य केंद्रांवरही जसे निरूपणासह भजन होऊ लागले तसे त्या-त्या ठिकाणी परिचित अभंगांची भर भजनाच्या वेळी पडत गेली. त्यामुळे या दुसऱ्या आवृत्तीत १३५ अभंगांचा समावेश झाला आहे.

सत्य साईबाबांच्या परंपरेतल्या धुनींचा समावेश असलेले भजन त्यांच्या भक्तांनी प्रबोधिनीत केलेले आहे. तुकडोजी महाराजांच्या परंपरेतील भक्तांनीही प्रबोधिनीत भजन केले आहे. आधुनिक कवींच्या भक्तिगीतांचे गायनही झाले आहे. वर्षभरात विविध काळी अनेक पद्धतींनी भजन व्हावे; पण आषाढी एकादशीच्या निमित्ताने होणारे भजन वारकरी संप्रदायाच्या पद्धतीप्रमाणेच व्हावे असे धोरण प्रबोधिनीत पाळले जाते. अर्थात महाराष्ट्राबाहेर भजन करताना तेथील स्थानिक पद्धतींचा आदर केला जाईलच. त्यादिवशीच्या भजनात निवृत्तीनाथ ते निळोबा या कालखंडातीलच मराठी तसेच उत्तर किंवा दक्षिण भारतीय संतांच्या रचना गायल्या जातात. अशा भजनांसाठी हे संकलन उपयुक्त आहे. त्यामुळेच वारकरी पद्धतीने सुरुवातीला पंचपदी व शेवटची आरती व्हावी म्हणून त्यावेळी म्हणायच्या अभंग, पदे, श्लोक व धुनींचा समावेश या पुस्तिकेत केला आहे. या संकलनाचा जास्तीतजास्त जणांनी साक्षेपी लाभ घ्यावा अशी अपेक्षा आहे.

१९ आषाढ शके १९४४
१० जुलै २०२२, आषाढी एकादशी

**– वाच. गिरीश श्री. बापट**
**संचालक, ज्ञान प्रबोधिनी**

# अंतरंग

**टीप : कालानुक्रमे सुरुवातीला महाराष्ट्रातील संत व त्यानंतर कालानुक्रमे महाराष्ट्राबाहेरील संतांचे अभंग घेतले आहेत. त्या–त्या संतांच्या अभंगांचा क्रम अकारविल्हे लावलेला आहे.**


**✻ पंचपदी** ८

**✻ संत निवृत्तीनाथांचे अभंग ✻**

१. त्रैलोक्य पावन जनी जनार्दन ९
२. साधक बाधक न बाधी जनक ९

**✻ संत ज्ञानदेवांचे अभंग ✻**

१. अकार उकार मकार १०
२. अरे अरे ज्ञाना झालासी पावन १०
३. अवघाचि संसार १०
४. एक तत्त्व नाम ११
५. गोविंदाचे गुणी वेधले ११
६. तुज सगुण म्हणो ११
७. पाहे या ध्वजाचे चिरगुट १२
८. पैल तो गे काऊ कोकताहे १२
९. सोनियाचा दिवस आजि १३

**✻ संत मुक्ताबाई यांचे अभंग ✻**

१. मुंगी उडाली आकाशी १३

**✻ संत नामदेवांचे अभंग ✻**

१. अमृताहुनी गोड १४
२. एक अनेक बिआपक पूरक १४
३. एकतत्त्व एकाकार सर्व देशी १५
४. झणी दृष्टी लागो १५
५. दुर्लभ नरदेह १५
६. देव दयानिधि १६
७. देह जावो अथवा राहो १६
८. निंदिल हे जन १६
९. पंढरीचा वास चंद्रभागे स्नान १७
१०. पंढरीनिवासा सखा पांडुरंग १७
११. माझा भाव तुझे चरणी १७
१२. मोको तार ले रामा तार ले १८
१३. साराचेही सार १८
१४. सुखालागी करिसी तळमळ १८

**✻ संत जनाबाईंचे अभंग ✻**

१. ज्याचा सखा हरी १९
२. दळू कांडू खेळू १९
३. धरिला पंढरीचा चोर १९
४. ये ग ये ग विठाबाई २०
५. विठ्ठला नाम तुझे चांगले २०
६. सुंदर माझे जाते गे २१

**✻ संत सावतामाळींचे अभंग ✻**

१. आमची माळियाची जात २२
२. कांदा मुळा आणि भाजी २२

**✻ संत नरहरी सोनार यांचे अभंग ✻**

१. देवा तुझा मी सोनार २२

## ✻ संत सेना यांचे अभंग ✻


१. करिता परोपकार २३
२. घेता नाम विठोबाचे २३
३. जाता पंढरीसी सुख वाटे २३


## ✻ संत चोखामेळांचे अभंग ✻


१. अबीर गुलाल २४
२. ऊस डोंगा परि २४
३. का हो केशिराजा २५
४. गोजिरे साजिरे श्रीमुख चांगले २५
५. टाळी वाजवावी २५
६. विठ्ठल विठ्ठल गजरी २६


## ✻ संत सोयराबाईंचे अभंग ✻


१. सुखाचे हे नाम २६


## ✻ संत कान्होपात्रा यांचे अभंग ✻


१. नको देवराया २७
२. पतित तू पावना २७


## ✻ संत विष्णुदासांचे अभंग ✻


१. माझी रेणुका माऊली २७
२. येई हो विठ्ठले २८
३. येतिया पुसे जातिया धाडी २८


## ✻ संत केशवदास यांचे अभंग ✻


१. विठूचा गजर हरिनामाचा २९


## ✻ संत जनार्दस्वामी यांचे अभंग ✻


१. देह शुद्ध करुनी २९


## ✻ संत एकनाथांचे अभंग ✻


१. अनादि निर्गुण ३०
२. आवडीने भावे ३०
३. ऐसे असावे संसारी ३१
४. काया ही पंढरी ३१
५. कैवल्याचा पुतळा ३२
६. कैसी समचरणीची शोभा ३२
७. धन्य तोचि जगी ३३
८. ध्यानाचे हे ध्यान ३३
९. नाही कुणाचे कुणी ३४
१०. मागे पुढे विठ्ठल भरला ३४
११. माझे माहेर पंढरी ३४
१२. विठ्ठलावाचोनि ३५
१३. वेद जयालागी ३५
१४. स्त्री टाकोनि फकीर झाला ३५


## ✻ संत तुकारामांचे अभंग ✻


१. आजि आनंदु रे ३६
२. आजि म्या देखिली पंढरी ३६
३. आणिक दुसरे ३७
४. आनंदाचे डोही ३७
५. आम्ही बी घडलो ३७
६. आम्ही विठ्ठलाचे दास ३७
७. आम्ही वैकुंठवासी ३८
८. उदंड पाहिले उदंड ऐकिले ३८
९. उंबरातील कीटका ३८
१०. काय वानू आता ३९
११. कृपाळू सज्जन ३९

१२. खेळ मांडियेला ३९
१३. घेई घेई माझे वाचे ४०
१४. चाले हे शरीर ४०
१५. जाऊ देवाचिया गावा ४०
१६. जातो माघारी पंढरीनाथा ४१
१७. जाणोनी नेणते करी ४१
१८. जेणे घडे नारायणी ४१
१९. जेथे जातो तेथे ४२
२०. जैसी गंगा वाहे ४२
२१. दया तिचे नाव ४२
२२. देवासी अवतार ४२
२३. पवित्र ते कुळ ४३
२४. पवित्र होईन ४३
२५. पापाची वासना ४३
२६. पैल आले हरी ४४
२७. भावभक्तिवादे करावे कीर्तन ४४
२८. भूर्ती देव म्हणोनि ४४
२९. मी गातो नाचतो आनंदे ४५
३०. राजस सुकुमार ४५
३१. लहानपण दे गा देवा ४५
३२. वर्ण अभिमाने ४६
३३. विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी ४६
३४. वृक्षवल्ली आम्हा सोयरे ४६
३५. शुद्धबीजापोटी ४७
३६. सद्गुरुवाचोनि सापडेना ४७
३७. सदा माझे डोळे ४७
३८. सुंदर ते ध्यान ४७
३९. हरि हरि तुम्ही म्हणा ४८
४०. हेचि थोर भक्ति ४८
४१. हेचि दान देगा देवा ४८
४२. क्षण क्षण हाचि ४८
४३. ज्ञानियांचा राजा ४९

**✻ समर्थ रामदासांचे अभंग ✻**

१. इथे का रे उभा श्रीरामा ४९
२. कथानिरुपणे ४९
३. कुग्रामीचा वास ५०
४. चौपदी/पावनभिक्षा ५०
५. पतितपावना जानकीजीवना ५१
६. राघवाची कथा पतितपावना ५२
७. राम आकाशी पाताळी ५२
८. रामाचे भजन ५२

**✻ संत निळोबारायांचे अभंग ✻**

१. मौन का हो धरीले? ५३

**✻ संत नरसी मेहता यांचे अभंग ✻**

१. वैष्णवजन तो तेने कहिअे ५३

**✻ संत कबीर यांचे अभंग ✻**

१. गुरु बिन कौन बतावे बाट ५४
२. झीनी झीनी झीनी ५४
३. ठाडे बीटपर हातकटीपर ५५

**✻ संत रोहिदासांचे अभंग ✻**

१. प्रभुजी तुम चंदन हम पानी ५६
२. राम नाम घेता ५६

**✻ संत मीराबाई यांचे अभंग ✻**

१. पायोजी मैंने राम रतन ५७
२. माईरी मैंने लीनो ५७
३. हरिनाम बिना ५७

**✻ संत पुरंदर दास यांचे अभंग ✻**

१. देव बंदा नम्म स्वामी बंदानो ५८
२. भाग्यदा लक्ष्मी बारम्मा ५९

**विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील संत**

**✻ संत सोहिरा यांचे अभंग ✻**

१. हरिभजनाविण काळ ६०

**✻ संत तुकडोजी यांचे अभंग ✻**

१. अरे रिकामा कशाला फिरत ६१
२. मनी नाही भाव ६१
३. हर देश में तू ६२
४. हरिनाम हे फुकाचे ६२

**✻ बाबा महाराज वैद्य यांचे अभंग ✻**

१. नियम पाळावे जरि ६३

**✻ धून ✻**

१. अरे किती आनंद रे ६४
२. गोपाला गोपाला रे ६४
३. जय जय पांडुरंग हरि ६४
४. जय जय विठोबा रखुमाई ६५
५. दशरथनंदन राम राम ६५
६. तुझी आण वाहीन ६५
७. पंढरीचा पांडुरंग विटेवरी ६५
८. पंढरीस जा जा कुणी ६६
९. प्रेममुदित मनसे कहो राम ६६
१०. बोल हरी बोल ६६
११. मनात भरली पंढरी ६७
१२. या विठूचा गजर हरि नामाचा ६७
१३. रामा रामा रघुनंदना ६७
१४. विठ्ठला हरि विठ्ठला ६८
१५. स्मित स्मित सुंदर ६८
१६. हरि सुंदर नंद मुकुंद ६८
१७. हरि हरि स्मरण करू ६९
१८. ज्ञानेश्वर माऊली ६९

**✻ आरती ✻**

१. बोलिली लेकुरे ७०
२. करुनी आरती ७०
३. आरती ज्ञानराजा ७०
४. आरती तुकाराम ७१
५. घालीन लोटांगण ७१
६. आकल्प आयुष्य व्हावे ७१
७. हेचि व्हावी माझी आस ७२
८. मागणे ते एक ७२


❀❀❀

# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।
जें खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचें ।।
दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।
वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु या भूतां ।।
चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।
किंबहुना सर्व सुखीं । पूर्ण होऊनी तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ।।
तेथ ह्मणे श्री विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।

या पुस्तिकेतील काही अभंगांच्या चाली समजून घेण्यासाठी सोबतचा QR Code स्कॅन करा. त्यातून तुम्ही गुगल ड्राइव्हवर जाल. तेथे तुम्हाला यातील काही अभंगांच्या चाली ऐकता येतील. या पुस्तकातील अधिकाधिक अभंगांच्या चाली या QR Code द्वारे तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा पुढील काळात आमचा प्रयत्न राहील. धन्यवाद!

मूल्य
₹ ४०/-

वितरण : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०. दूरभाष - ०२०-२४२०७१७४
www.jpprakashane.org